# प्रकरण ७ वे

# या विषयासंबंधी पुढील संशोधनासाठी विषय

## ( SUGGESTION FOR THE FURTHER STUDY)

# प्र क र ण ७ वे

## // या विषयासंबंधी पुढील संशोधनासाठी विषय //

संशोधकास "परळी-वैजनाथ शहरातील माध्यमिक शाळांमधील शारीरिक शिक्षणाच्या वस्तुस्थितीचा चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास करीत असतांना या विषयाच्या अभ्यासाला बऱ्याच मर्यादा पडलेल्या आढळल्या. उपलब्ध वेळ, खर्च व श्रम इत्यादींचा विचार करता संशोधकाने केवळ परळी शहराच्या माध्यमिक विद्यालयाचाच नमुना म्हणून अभ्यास केला. अभ्यास करीत असतांना संबंधीत विषयाची संख्येने अधिक व अधिक सखोल अभ्यास विषयाची क्षेत्रे संभवत असल्याची जाणीव संशोधकास झाली. या सर्व क्षेत्रामध्ये दर्जेदार व अधिक सखोल संशोधन होण्याची गरज आहे. असे प्रमाणिकपणाने वाटते. ते विषय असे —

[१] एखाद्या शहराचा छोटा नमुना सर्वेक्षणासाठी निवडण्याऐवजी एखादा जिल्हा किंवा एखादी विभाग नमुना म्हणून निवडून याच धर्तीवर थोडेसे व्यापक सर्वेक्षण हाती घेण्यास वाव आहे. त्यायोगे कदाचीत काही वेगळे निष्कर्ष निघण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेंव्हा असा मोठा नमुना घेता येणे पुढील संशोधकास शक्य आहे.

[२] या सर्वेक्षणात शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रमा संबंधीचा फारसा उहापोह करण्यात आलेला नाही व तसा या सर्वेक्षणाचा उद्देश ही नव्हता. तथापी थोडासा सखोल विचार करता शारीरिक शिक्षणाचा मुलींकरीता स्वतंत्र अभ्यासक्रम कसा असू शकेल हा पुढील संशोधनाचा विषय होऊ शकेल.

[३] उद्दिष्टे व अभ्यासक्रम याची छाननी केली असता, उद्दिष्टे साध्य होण्यास अभ्यासक्रमात कमी अवसर असल्याचे जाणवते. एक तर उद्दिष्टे मर्यादित करावयास हवीत नाहीतर अभ्यासक्रम व्यापक करावा लागेल, याबाबत व्यावहार्यता पाहून काय व कसे करता येईल याबातही संशोधन करणे गरजेचे आहे.

[४] मुलींच्या अभ्यासक्रमा बरोबरच मुलींच्या शारीरिक शिक्षणाच्या अध्यापन पध्दती कशा असू शकतील या बद्दलही संशोधनास वाव आहे.

[५] शारीरिक शिक्षणावरती दर डोई सध्या होत असलेला खर्च व शारीरिक शिक्षणाची सर्व उद्दिष्टे साध्य होण्यासाठी करावा लागणारा दरडोई खर्च याचा तौलनिक अभ्यासही करणे मनोरंजक ठरेल. या क्षेत्रातील भावी संशोधकाना हे एक प्रमुख आव्हानच ठरेल.

[६] शारीरिक शिक्षणाकडे पाहण्याचा समाजाचा, शासनाचा व शिक्षकाचा दृष्टीकोन बदलून या विषयाचे महत्व कसे वाढेल [पटेल] या बाबतही काही विचार करता येण्याजोगा आहे.

[७] शारीरिक शिक्षण बाबत शासनाचा [प्रशासकिय ] विचार व आचार यामध्ये काही विसंगती व बरेच अंतर असल्याचे संशोधकास वाटते. यावरुन "शासनाचा शारीरिक शिक्षण विषयीचा दृष्टीकोन व्यक्त करणारी परिपत्रके, कायदे, नियम इत्यादी व त्याची प्रत्यक्ष अमलबजावणी होते कींवा नाही होत असल्यास कितपत होते. होत नसल्यास त्यातील अडचणी" या बाबत ही संशोधन होणे शक्य आहे.

[८] शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करता येण्यासाठी

इयत्तावार आठवड्याच्या किती तासीकांची गरज भासेल. या बाबतही प्रायोगीक संशोधन करता येण्यासारखे आहे.

[९] प्रचलित अभ्यास क्रमाची नीट छाननी करुन त्याचे "अध्यापनाचे व सरावाचे असे वेगवेगळे स्वरुप" या वरही बराच विचार करता येण्यासारखे आहेत.

[१०] शारीरिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम या बाबतही संशोधन करणे गरजेचे आहे.

][ ][ ][